# लेखकाचे स्वातंत्र्य

## विचार स्वातंत्र्य : आस्थेचा आणि चिंतेचा विषय

लेखकाचे स्वाातंत्र्य आणि वाचकांचे स्वाातंत्र्य याबद्दल मी आपल्याशी आज बोलणार आहे. विचारस्वाातंत्र्य हा तुमच्या माझ्या सर्वांच्याच आस्थेचा आणि चिंतेचाही विषय आहे. या विषयाचे महत्त्व नियतीनेच माझ्या मनावर अगदी लहानपणापासून बिंबवले आहे. निजामी राजवटीतल्या मराठवाड्यात माझा जन्म झाला. राज्यकर्त्यांचा धर्म आणि त्यांची संस्कृती हीच श्रेष्ठ. इतरांनी जीव मुठीत धरून राहायचे, दुय्यम नागरिकाचे जीवन जगावयाचे असे त्यांचे आणि त्यांच्या समर्थकांचे तत्त्वज्ञान होते. सर्व नागरिकांना विचारांचे आणि अभिव्यक्तीचे स्वाातंत्र्य ही कल्पनाच त्या राजवटीला मान्य नव्हती. नागरिकांना विचार करण्याचे स्वाातंत्र्य दिले तर ते बंड करतील अशी भीती सर्वच हुकूमशहाप्रमाणे निजामालाही वाटत होती. सतराव्या शतकातला हॉलंडमध्ये राहणारा एक तत्त्वचिंतक स्पिनोझा म्हणाला होता की, माणसाच्या जिभेवर नियंत्रण ठेवता येते तसे त्याच्या मनावर नियंत्रण ठेवता आले असते तर जगातले सगळे राजे सुरक्षित राहिले असते. भारत स्वातंत्र झाला. निजामाचे राज्यही गेले.

## विचार करण्याची शक्ती - रेने देकार्त

इतर प्राण्यांपेक्षा जी गुणवैशिष्ट्ये मनुष्यप्राण्याला श्रेष्ठ ठरवतात त्यातले सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मनुष्याला विचार करता येतो. आपल्या भूतकाळापेक्षा वर्तमानकाळ किती चांगला अगर वाईट आहे, आपला भविष्यकाळ कसा असला पाहिजे, अशा सर्वच गोष्टींविषयी मनुष्य विचार करू शकतो. आपल्याबरोबर तो अर्थातच समाजाचाही विचार करतो. विचार करण्याची ही शक्ती प्रगतीची प्रेरणा देणारी शक्ती आहे. त्यामुळे जगात झालेल्या परिवर्तनांच्या मागे मनुष्याची विचारशक्ती ही एक महत्त्वाची प्रेरणा आहे. फ्रेंच तत्त्वज्ञ रेने देकार्त याने विचार करण्याची शक्ती हीच मनुष्याच्या अस्तित्वाची खूण मानली. ज्याअर्थी मी शंका घेतो, विचार करतो, त्याअर्थी शंका घेणारा, विचार करणारा असा मी अस्तित्वात आहे, असा त्याचा सिद्धांत आहे. I think, therefor I am. हे देकार्तचे सूत्र तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा निष्कर्ष मानला जातो. मनुष्याच्या विचारशक्तीमुळेच जगाच्या अस्तित्वाबद्दल, ते निर्माण करणारा कोणी आहे का याबद्दल निसर्ग आणि माणूस यांच्या संबंधाबद्दल विचार झाला. विज्ञानातील नवे नवे शोध लागले. अनेक सामाजिक शास्त्रांचा जन्म झाला आणि विकासही झाला.

## विचारस्वातंत्र्याचे युग

खरे म्हणजे भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा उदारतेला आणि विचारस्वाातंत्र्याला जपणारी आहे. प्राचीन ज्ञानपरंपरेचे एक ऋषितुल्य अभ्यासक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते उपनिषद्काळापासून ते आस्तिकनास्तिक दर्शने निर्माण होईपर्यंतचा सुमारे एक हजार वर्षाचा काळ हा विचारस्वाातंत्र्याचे युग होता. या खुल्या वातावरणामुळे सैद्धांतिक चर्चा होत, अनेक नव्या शास्त्रविचारांचा जन्म होई. वैचारिक विरोध ही विचारवाढीची प्रर्वतक शक्ती आहे, अशी जाणीव प्राचीन भारतीयांच्या ठिकाणी होती. नास्तिक हा दावेदार म्हणून नष्ट न करता खेळगडी म्हणून वैचारिक क्रीडांगणात सामील करून घ्यावयाचा असा या विद्याविषयक बौद्धिक संस्कृतीचा बाणा होता असा त्यांचा निष्कर्ष आहे. वैज्ञानिक दृष्टीला संपूर्ण विचारस्वाातंत्र्याचे अधिष्ठान असावे लागते. युरोपमध्ये मध्ययुगीन धर्मसंस्थांची आणि अंधश्रद्धेची जाचक बंधने होती. त्यांचा सामना करीत, आपल्या वैज्ञानिक शोधाच्या,

भूमिकेच्या समर्थनार्थ आत्मबलिदानाची तयारी ठेवत युरोपातल्या विज्ञान संशोधकांनी नवे शोध लावले. भारतात मात्र संपूर्ण धर्मस्वाातंत्र्य आणि विचारस्वाातंत्र्य होते, त्यामुळे नवा विचार मांडणारांवर अशी पाळी येत नसे, असेही शास्त्रीजींनी सांगितले आहे.

विचार केला पाहिजे, तो व्यक्त करता आला पाहिजे, त्याच्या गुणवत्तेवर निर्लेप मनाने चर्चा होऊ शकली पाहिजे आणि त्याची चिकित्साही झाली पाहिजे. इमॅन्यूअल कांटने आजचे युग चिकित्सेचे युग आहे, टीकेचे युग आहे, असे म्हटले आहे. "Our age, in special degree, is the age of criticism, and to such criticism everything must submit." चिकित्सकबुद्धीनेच जग पुढे गेले. गुरुत्वाकर्षणाचा न्यूटनला लागलेला शोध, आर्थिक विषमतेचे मूळ शोधण्याचा मार्क्सने केलेला प्रयत्न हे सारे चिकित्सक बुद्धीतूनच निर्माण झालेले आहे. चिकित्सा झाली म्हणजे विचारांच्या संशोधनाच्या सत्यासत्याची खात्री करून घेता येते. अगदी जुन्या काळातसुद्धा आम्ही म्हणतो तोच धर्म, तेच तत्त्वज्ञान आणि तेच खरे असा आग्रह धरणारे लोक जगाच्या पाठीवर होते. त्यांना चिकित्साच नको असते. अलेक्झांड्रियावर जेव्हा मुस्लिमांनी आक्रमण केले, तेव्हा तेथले जगप्रसिद्ध ग्रंथालयच जाळून टाकले. पाकिस्तानी शासकांनी बांगला देशमधल्या ढाका विद्यापीठाला लक्ष्य करून नवा विचार करणाऱ्या प्राध्यापकांची एक पिढीच मारून टाकली. ही झाली उघडउघड क्रौर्याची उदाहरणे. कायद्याने मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करून तिच गोष्ट केली जाते. एखाद्या पुस्तकावर सरकार बंदी घालते म्हणजे काय होते, प्रत्यक्षात ते पुस्तक वाचण्याचा वाचकांचा अधिकार काढून घेतला जातो. सलमान रश्दी यांच्या Satanik Verses या कादंबरीवर त्यावेळच्या भारत सरकारने ती कादंबरी भारतात येण्यापूर्वीच बंदी घातली आणि वाचकांना ती कादंबरी पाहताही आली नाही.

**संयम, विनय आणि औचित्य**

मराठी लेखकांनासुद्धा शासनाच्या आडमूठपणाचा जाच भोगावा लागलेला आहे. मर्ढेकराच्या काही कविता आणि चंद्रकांत काकोडकरांच्या 'श्यामा' कादंबरीबद्दल भरण्यात आलेल्या खटल्यांची आठवण आपणा सर्वांना आहे. दुसऱ्याचे अभिव्यक्तीचेच काय, पण कोणतेच स्वाातंत्र्य मनोमन मान्य करणे ही अवघडच गोष्ट असते. सरकार अडाणी असू शकते, हेकेखोरही असते, त्याला पु.मं. लाडांसारख्या आपणच नेमलेल्या तज्ज्ञ माणसाने खटला भरू नये असा दिलेला सल्लासुद्धा नको असतो, हे आपल्याला माहीत आहे. पण मर्ढेकरांच्या अभिव्यक्ती स्वाातंत्र्यावर बंधन घालण्याचा प्रयत्न एकट्या सरकारनेच केलेला नव्हता. साहित्य संमेलनात मर्ढेकर कविता वाचत असताना आणि नंतरही त्यांची हेटाळणी करण्यात आली. पण त्या मेळाव्यात फक्त खादीचे पंचे गुंडाळलेला एक तपस्वी उभा राहिला आणि त्याने या हेटाळणीकडे दुर्लक्ष करून आपल्या अनुभवाशी प्रामाणिक रहा आणि जे पटेल तेच लिहा असा मर्ढेकरांना जाहीर सल्ला दिला. मर्ढेकरांवर खटला झाला तेव्हा काही मित्र त्यांच्या मदतीला आले. पण साहित्यिकांच्या संस्था संघटितपणे त्यांच्यामागे उभ्या राहिल्याचे दिसले नाही. असे का व्हावे? एखादी कविता किंवा कादंबरीसारखी वाङ्मयकृती आपल्याला आवडत नसेल, पण तिच्यावर बंदी घालावी याला तर विरोध व्हावयास हवा. कादंबरी चांगली नाही, तिच्यात कालविपर्यास आहे, असे अनेक आक्षेप आपल्या मनात असू शकतात; पण लेखकाला वाईट कादंबरीसुद्धा लिहिण्याचे स्वाातंत्र्य आहे अशी भूमिका साहित्यिकांनी संघटितपणे घेतली नाही. प्रत्येक लेखकाला आपापला लढा स्वतःच्या कुवतीनुसार लढवावा लागला. विचारस्वाातंत्र्याचे, अभिव्यक्ती स्वाातंत्र्याचे महत्त्व समाजातल्या इतरांना सोडा, निदान लेखकांना तरी वाटले पाहिजे. अलीकडील काळात सरकारच्या काही कारवायांबद्दल अगर लेखकांवर झालेल्या हिंसक हल्ल्याबद्दल निषेध करण्यासाठी काही शहरातले लेखक एकत्र आल्याचे दिसले ही आशादायक गोष्ट आहे. श्री. पु. भागवत मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष

असताना त्यांनी केलेल्या एका भाषणात लेखकाचे अधिकार आणि त्याने पाळावयाची पथ्ये यांची आठवण करून दिली आहे.

"सर्व प्रकारच्या समाजरचनात अविष्कारस्वाातंत्र्यावर आक्रमण करणाऱ्या शक्ती कमीअधिक प्रमाणात दडलेल्या असतात. लोकशाहीच्या मुखवट्याखाली लोकशाहीच्या साधनांचाच विपरीत उपयोग करून आपल्या देशात हुकूमशाही येण्याची भीती आहे, असा इशारा डॉ. आंबेडकर वारंवार देत. त्यांचा तो इशारा किती समयोचित आणि दूरदृष्टीचाही होता हे आणीबाणीत सिद्ध झाले आहे."

आविष्कार स्वाातंत्र्याचा उपभोग घेताना पाळावयाचे श्री.पुं.नी सांगितलेले सर्वांत महत्त्वाचे पथ्य म्हणजे 'संयमाचं, विनयाचं आणि औचित्याचं.' विवेक सुटला तर वैचारिक वातावरण प्रदूषित होते याचीही आठवण श्री.पुं.नी दिली आहे.

उदारमतवादी नेहमीच अल्पमतात एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र हा माझ्या कुतूहलाचा विषय होता. ब्रिटिशांची राजवट आणि युरोपात विकसित झालेल्या नव्या शास्त्रांचे शिक्षण यामुळे नवशिक्षितांत कोणती मानसिक परिवर्तने झाली, त्यांना आत्मपरीक्षणाची किती प्रेरणा झाली, आपल्या पिछेहाटीची कोणती कारणे त्यांनी शोधली, प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार आणि समान स्वाातंत्र्य हे मूल्य त्यांनी कितपत स्वीकारले. या गोष्टीबद्दल मला औत्सुक्य होते. 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' हे पुस्तक लिहिण्यासाठी मला करावे लागलेले वाचन माझे मोठेच प्रशिक्षण करणारे होते. व्यक्तिस्वाातंत्र्य आणि त्यातूनच निर्माण झालेले विचार-अविष्काराचे स्वाातंत्र्य ही मूल्ये समाजात रुजवण्याचे प्रयत्न होताना आणि त्यांना परंपरावाद्यांचा कडवट विरोध होत असलेला मला जाणून घेता आला. उदारमतवादी नेहमीच अल्पमतात राहिले. असहिष्णुतेचा प्रचंड मनःस्ताप त्यांना सहन करावा लागला. आज तर जगभर असहिष्णुता वाढते आहे, भारत त्याला अपवाद नाही. देशातही घडणारी उदाहरणे आपण रोज वाचतो, त्यामुळे त्यांचा पुन्हा उल्लेख करण्याचे कारण नाही. विचारांचे आणि अभिव्यक्तीचे स्वाातंत्र्य आपण मनोमन स्वीकारले आहे काय, असा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारत राहिला पाहिजे.

शासनाने अभिव्यक्ती स्वाातंत्र्यावर बंधन घातले तर त्याविरुद्ध कायदा मोडून सत्याग्रह करता येतो किंवा न्यायालयात दाद मागता येते. परंतु अनेक वेळा अभिव्यक्ती स्वाातंत्र्यावरचे बंधन सरकार घालत नाही. समाजातले असहिष्णु गट ती बंधने आपल्या दडपणाने पत्रकार, लेखक आणि सामान्य माणसांवर लादतात. कित्येकवेळा त्याला हिंसक रूपही येते. याविरुद्ध न्यायालयात दाद मागून उपयोग नसतो. घटनेत सांगितलेले अधिकार सर्वकाळी प्रत्यक्षात कसे आणता येतील हा न सुटलेला प्रश्न आहे. त्याचे एक उत्तर समाजात सहिष्णुता हे मूल्य पुन्हा प्रस्थापित करणे हे आहे.

**उदारमतवादी नेहरू**

प्रभाकर पाध्यांनी जवाहरलाल नेहरूंचे अतिशय सुंदर शब्दरेखाटन केले आहे. 'विचारवंताला संकल्पनांच्या विरळ अमूर्त जगात मुक्काम करणे आवडले नाही तरी आपल्या विचारांचा कस वेळोवेळी पारखून घेण्याची, तो शक्य तितका वाढवून घेण्याची गरज असतेच. म्हणून पुस्तक हे त्याचे दैवत असते... तुरुंगात असताना नेहरूंनी अफाट वाचन केले आणि लेखनही केले. राज्यधुरा हाती आल्यानंतर ते अशक्य झाले. याची भरपाई म्हणून की काय ते विचारवंतांची कदर करीत.' अशा नेहरूंच्या दोन आठवणी पाध्यांनी सांगितल्या आहे. मौलाना आझाद यांच्या आत्मचरित्रात खुद्द नेहरूंवर टीका आहे. ही टीका लक्षात ठेवून हुमायूम कबीर त्यांच्याकडे गेले आणि अवघडलेल्या मनाने म्हणाले, "हे असलं चरित्र प्रसिद्ध व्हावं कां? त्यात आपल्यावर टीका आहे." कबीरांचे हे उद्गार ऐकल्याबरोबर

नेहरू संतापले. अगदी उखडलेच! ‘‘माझ्यावर टीका असेल नाही तर आणखी काही असेल, पण म्हणून ते चरित्र प्रसिद्ध न करण्याची कल्पना तुझ्या मनात येते तरी कशी?” असे ते गरजले.

आणखीही एक आठवण पाध्यांनी सांगितली आहे. दिल्लीला आकाशवाणीने आयोजित केलेल्या एका साहित्य समारोहात नेहरू साहित्यिकांसमोर बोलत होते. ते म्हणाले, ‘‘आम्ही राज्यकर्ते एक प्रकारच्या धुंदीत असतो, धांदलीत असतो, आमच्या योजनांची धुंदी, आमच्या कल्पनांची धांदल, यामुळे आमच्या हातून नेहमीच चुका होतात आणि आम्ही चुका करीत आहोत याची जाणीवही आम्हाला उरत नाही. अशावेळी आमच्या चुकांची आम्हाला जाणीव करून देणे हे तुम्हा बुद्धीवाद्यांचे कर्तव्य आहे.” आम्ही सगळे बुद्धिमंत आहोत, पण बुद्धीवादी आहोत की नाही, याबद्दल अनेकवेळा मनात शंका येते.

**निर्माणशील दृष्टीचं स्वातंत्र्य**

दुर्गाबाई भागवतांनी लेखकाच्या स्वाातंत्र्याची फार चांगली व्याख्या केली आहे. ‘माझं स्वाातंत्र्य म्हणजे माझ्या निर्माणशील दृष्टीचं स्वातंत्र्य, माझ्या जीवनदृष्टीचं स्वाातंत्र्य.’ दुर्गाबाईंना जे निर्माणशील दृष्टीचे स्वाातंत्र्य अभिप्रेत आहे त्यात लेखकाच्या मनातली लेखनपूर्व विचारप्रक्रियासुद्धा महत्त्वाची असते. एखादा विषय मनात येतो, लिहावेसे वाटते आणि नंतर दुसरा विचार येतो की, हे आपण लिहिले तर मग आपण पुरोगामी ठरू की प्रतिगामी ठरू? आपल्या वाचकांची काय प्रतिक्रिया होईल? सरकारदरबारी असलेल्या मित्रमंडळींना हे आवडेल की नाही? खरे म्हणजे लेखकाने घेतलेल्या अनुभवात पुरोगामी किंवा प्रतिगामी काही नसते. तो आपल्या अनुभवाशी प्रामाणिक आहे की नाही आणि तो अनुभव त्याला निखळ स्वरूपात मांडता येतो की नाही हेच महत्त्वाचे आहे. ‘वाडा चिरेबंदी’ मधले एका समाजाच्या कोसळण्याचे एलकुंचवारांनी केलेले चित्रण त्या एकच समाजापुरते राहत नाही. समाजव्यवस्थेच्या संक्रमणात कोणत्याही समाजाबद्दल घडू शकणारे ते चित्रण आहे. ‘देव चालले’ या नावाची दि. बा. मोकाशांची एक अगदी छोटीशी कादंबरी आहे. खेड्यात राहणाऱ्या कोरडवाहू तुकड्यावर जगत लोकश्रद्धेचा विषय झालेल्या एका मूर्तीच्या उपासनेत दिवस काढणाऱ्या ब्राह्मण कुटुंबाला शेवटी हळूहळू शहरात स्थलांतरित व्हावे लागते. त्या स्थलांतराच्या प्रक्रियेचा शेवटचा भाग म्हणजे देवांचे संपुष्ट शहरात गेलेली मुले गावातून आपल्याकडे घेऊन जातात. एका अपरिहार्य सामाजिक घटनेचे चित्रण मोकाशींनी संयमाने केले आहे. कुठेही कर्कशता नाही, तक्रारीचा सूर नाही. सायलीचे - माझ्या मुलीचे घर असलेल्या वसाहतीत काम करत असलेले एक गृहस्थ मला मुद्दाम भेटले. ‘आम्ही तुमच्याच जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातले राहणार आहोत. बहात्तरच्या दुष्काळात पोट भरणे कठीण झाले तेव्हा आम्ही मुंबईला आलो. चारसहा महिने कुर्ल्याच्या नऊ नंबरच्या फलाटावरच काढले. पुढे थोडेथोडे काम मिळत गेले. मुलेही शिकली. आता बरे आहे.’ दलित समाजातले हे गृहस्थ मराठवाड्यातून त्यावर्षी झालेल्या स्थलांतरितांचे प्रतिनिधी होते. अगोदर नाईलाज म्हणून गाव सोडावे लागले. पुढे परिस्थिती बदलली. बहात्तर सालच्या स्थलांतराची कोणी कथा लिहिली असती तर तो ललित वाङ्मयातला आमच्या सामाजिक इतिहासाचा भागच झाला असता. अशा लेखनात एक प्रकारची तटस्थ दृष्टी मात्र लेखकाला आवश्यक असते. लेखकाच्या तटस्थ पण तरीही मानवी ओलावा असलेल्या दृष्टीने व्यंकटेश माडगूळकरांनी ‘माणदेशी माणसे’ लिहिली त्याच तटस्थ दृष्टीने त्यांनी ‘वावटळ’ही लिहिली. दुःख आणि वेदनेनेसुद्धा आपल्या अंगावर एखादे लेबल वागवण्याची गरज नसते.

**सत्तेला होणारे मोह**

लेखकाच्या स्वाातंत्र्यावर सर्वांत दुःखदायक हल्ला म्हणजे त्याचे लेखनकर्तृत्वच नाकारणे. साहवाहनाच्या काळात होऊन गेलेल्या गुणाढ्याची एक कथा सांगितली जाते. गुणाढ्याचे विश्वसनीय चरित्र उपलब्ध नाही. त्यामुळे

या कथेलाही दंतकथाच समजले पाहिजे. लेखक गुणाढ्याने एक मोठा ग्रंथ रचला आणि राजाला तो दाखवला. राजा त्या लेखनाचे गुण ओळखणारा होता, परंतु त्याच्याही मनात अभिलाषा होत्याच. त्यावेळच्या राजांना प्रसिद्धीची इतर साधने उपलब्ध नव्हती. राजाने गुणाढ्याला सांगितले. ग्रंथाच्या शेवटी कर्ता म्हणून तुझ्या नावाऐवजी तू माझे नाव घाल. मी तुला संपत्तीने समृद्ध करीन. गुणाढ्य दरबारातून परत निघाला. दूर जंगलात गेला आणि त्याने आपल्या ग्रंथाची पाने अग्निनारायणाला अर्पण करण्यास सुरुवात केली. लेखकाचे नावच अदृश्य करून ते कर्तृत्व राजाला बहाल करणे हा लेखकाच्या स्वाातंत्र्याचा सगळ्यात मोठा अधिक्षेप होता.

त्यानंतर यादवांच्या राज्यातसुद्धा एका राजाने असाच प्रयत्न केला होता. ‘रुक्मिणी स्वयंवर’ या महानुभवांच्या पवित्र कृष्णकथेचा कर्ता नरेन्द्र याच्यावरच असा प्रसंग आलेला होता. नरेन्द्र आणि त्याचे दोन भाऊ राजसभेत असलेले कवी होते. त्याने रुक्मिणी स्वयंवर रचले. राजाच्या आज्ञानेनुसार त्याने ते राजसभेत वाचून दाखवायला सुरुवात केली. ऐकता ऐकता राजाला ते काव्य आवडू लागले आणि मोहही पडू लागला. ‘या ग्रंथाचे कर्तृत्व सांगणारा उल्लेख माझ्या नावाने करा मी प्रत्येक ओवीसाठी एक एक सुवर्णनाणे कवीराज तुम्हाला देईन’ असे आश्वासन त्याने दिले. स्वााभिमानी कवी अस्वस्थ झाला होता. तो राजाचे असले विकृत मागणे मान्य करणे शक्य नव्हते. तो उत्तरला “ना राजे हो, आमुचेया कवीकुळा बोलू लागैला.” राजाने मग दुसरीच युक्ती काढली. तो म्हणाला, ग्रंथ आमच्या दफ्तरी राहू द्या. नरेन्द्राला पुन्हा सरळ नकार देण्याचे सामर्थ्य आणायचे होते. त्याने युक्ती केली. ‘काव्यग्रंथात काही अशुद्धे असतील तर पुन्हा तपासावी म्हणून मी हा ग्रंथ घरी घेऊन जातो. उद्यापर्यंत मी दरबारी आणून देईन,’ असे सांगून तो ग्रंथ घरी घेऊन आला. त्या रात्री त्याने त्याच्या दोन्ही भावांनी संपूर्ण रुक्मिणी स्वयंवराची प्रत करून घेण्याचा प्रयत्न केला. सर्वांची मिळून सुमारे नऊशे ओव्यांचीच प्रत होऊ शकली. नाईलाजाने सकाळी दरबारी ग्रंथ नजर केला आणि आज आपल्याला घरी नकलेली साधारण नऊशे ओव्यांचीच प्रत उपलब्ध आहे. संपूर्ण प्रत राजदरबारी जप्त झाली, असे ही कथा आपल्याला सांगते. राजसत्तेला अनेक मोह होऊ शकतात आणि लेखकांवर अनेक प्रकारचे दडपण येऊ शकते. हा प्रकार सर्व सत्तांच्या कालखंडात घडू शकतो. लेखकाने अशा दडपणांचा प्रतिकार करण्याची शक्ती सतत कायम ठेवणे हाच त्यावरचा उपाय आहे.

**स्वतःच घातलेल्या मर्यादा**

लेखकाच्या स्वातंत्र्यावर येणाऱ्या बाह्य बंधनांचा थोडासा विचार मी आपल्याबरोबर केला. लेखकाच्या स्वाातंत्र्यावर खरे म्हणजे सर्वांत जास्त बंधने ते स्वतःच घालत असतात. आपणच निर्माण केलेले सापळे आणि आपणच घालून घेतलेल्या मर्यादा यांच्यामध्ये आपण बंदिस्त होत आहोत, हे लेखकाच्या लक्षातच येत नाही. एखादा लेखक एक वाङ्मयकृती निर्माण करतो आणि ती प्रचंड यश मिळवते, लोकप्रिय होते. ही लोकप्रियता कित्येकवेळा त्याला नव्या आशयाचा आणि नव्या आकृतीचा विचारच करू देत नाही. एखाद्या चित्रपट निर्मात्याचा एक चित्रपट सध्याच्या भाषेत सांगायचे तर हीट होतो. खूप पैसा मिळवतो आणि मग त्याला त्या चित्रपटात आपण जे जे घातले होते ते ते नव्या चित्रपटात घातले म्हणजे नवा चित्रपटही तसाच लोकप्रिय होईल असे वाटते. मराठीत एकाकाळी तमाशापट निर्माण झाले. तसे वाङ्मयक्षेत्रातसुद्धा घडू शकते. लेखक आपले निर्माणशील दृष्टीचे स्वाातंत्र्य स्वतःच सोडून देतो. वाचकांना खूप आवडलेल्या वाङ्मयकृतीसारखेच लेखन सारखे करू पाहतो. एकाच साच्याच्या वाङ्मयकृती तो लिहितो. माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एक जुने पण चांगले उदाहरण देतो. मराठीतील एक लोकप्रिय सिद्धहस्त कादंबरीकार नारायण सीताराम फडके यांच्या ‘जादूगार’ आणि आणखी एकदोन प्रारंभीच्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या. वाचकांना कशी कादंबरी आवडते याचा एका साचाच फडक्यांच्या मनात तयार झाला. त्यांच्या पुढच्या सगळ्या कादंबऱ्या, पात्रांची नावे आणि प्रसंग वेगवेगळे असले तरी, साधारण एकाच जातीच्या लिहिल्या

गेल्या. वि.स. खांडेकरांच्या मनात नायक देशभक्त असावा असे इतके रुतले की, त्यांच्या अनेक सामाजिक कादंबऱ्यात तसेच नायक जन्माला आले. ही लेखकानेच आपल्या स्वातंत्र्याला घातलेली मर्यादा असते. नवे अनुभव घेऊन त्यातून जन्माला आलेला घाट आणि आशय मांडण्याची त्याला शक्ती कायम असली पाहिजे. पण काही वेळा असे होत नाही. हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर आपण एक कादंबरी लिहावी असे फडक्यांच्या मनाने घेतले ते हैदराबादला आले. त्यांनी लढ्याचे नेतृत्व केलेल्या काही तरुणांना बोलावून त्यांच्याकडून माहितीही घेतली. 'सितारा मंजिल' कादंबरी जन्माला आली. गावाची नावे बदलली होती. नायक चळवळीत असल्याचे उल्लेख होते. प्रत्यक्षात फडक्यांच्या नेहमीच्या प्रणयकथेसारखीच ती एक कथा होती. त्यांच्यासारख्या मोठ्या आणि सामर्थ्यवान लेखकाबद्दल असे होऊ शकते तर इतरांबद्दल तसे घडणे स्वाभाविक मानले पाहिजे. जे ललित लेखनाबद्दल होते तेच समीक्षेबद्दलसुद्धा होऊ शकते. वाङ्मयाबद्दलचा विशिष्ट शेरा लोकांना आवडतो असे दिसले तर तोच पुन्हा उपयोगात आणण्याचा मोह होतो.

बाह्यबंधनाइतकीच लेखकाने स्वतःवर घालून घेतलेली बंधनेही त्याच्या स्वातंत्र्याचा अधिक्षेप करणारी असतात. त्याची त्याला कित्येकवेळा जाणीव नसते. म्हणून ती त्याला जाचक वाटत नाहीत, पण तीही त्याच्या प्रतिभेला लगाम घालणारीच असतात. दोन्ही बंधनातून मुक्त राहणे म्हणजेच लेखकाने आपल्या लेखनस्वातंत्र्याचा खरा उपभोग घेणे आहे.

वैचारिक साहित्याबद्दलचा श्री. ग. माजगावकर पुरस्कार स्वीकारताना
पुणे येथे 15 सप्टेंबर 2019 रोजी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.